MHAU020064522022

## निशाणी १ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज वारसप्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यासाठी केला आहे.

२. अर्जदाराचे प्रकरण असे की : अर्जदार हे मयत आसाराम कारभारी घुगे [संक्षेपात 'मयत आसाराम'] यांचे मुलगे आहेत. मयत आसाराम यांचा मृत्यु दि.३०.०९.२०११ रोजी आंतरवाली खांडी, ता. पैठण येथे झाला आहे. तसेच मयत आसाराम याची पत्नी म्हणजेच अर्जदारांची आई हौसाबाई आसाराम घुगे हिचा मृत्यु दि.३०.११.२०१५ रोजी झालेला आहे. मयत आसाराम हे स्वातंत्र्य सैनिक होते व त्यांना निवृत्ती वेतन योजना लागु होती. असाराम याच्या मृत्युनंतर त्याची पत्नी हौसाबाई हिस निवृत्ती वेतन मिळत होते. मयत हौसाबाई हिच्या नावे सन ०१.०६.२००४ ते ३०.११.२०१५ या कालावधीतील निवृत्ती वेतन फरकाची रक्कम रु.७,७९,२९६/- जिल्हाधिकारी कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, औरंगाबाद यांच्याकडे जमा आहेत.

३. अर्जदार हे मयत हौसाबाई हिचे कायदेशीर वारसदार आहेत. मयत हौसाबाई हिस अर्जदारांशिवाय ईतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. करिता प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारांनी उपरोक्त रक्कम मिळण्यासाठी मयत हौसाबाई हिचे वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र.४ च्या नावे मिळणेबाबत

विनंती केली आहे.

४. अभिलेखानुसार, नि.२३ वर अर्जदारपक्षाने 'आनंद नगरी' वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द दिनांक १७.०२.२०२३ रोजीचे जाहिर नोटीस प्रत दाखल केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय येथे जाहीर नोटीस बजावल्याचे व न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीर नोटीस डकवल्याबाबत नि.२० वर बेलीफ रिपोर्ट दाखल आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे प्रस्तुत प्रकरणासंबंधी ३० दिवसांच्या आत आक्षेप मागविण्यात आले. परंतु, आतापर्यंत कुणाचा काही आक्षेप आलेला नसल्याचे अभिलेखावरुन आढळते.

५. अर्जापुष्ठ्यर्थ अर्जदारांनी साक्षशपथपत्रे नि.२४ ते २७ वर दाखल केले असून अर्जकथने पुनरुच्चारित केली आहेत. याशिवाय अर्जदारांनी खालीलप्रमाणे सहाय्यक अधिक्षक यांनी पडताळणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत : जिल्हाधिकारी कार्यालय यांना दि.१५.०२.२०२१ रोजी दिलेले पत्र नि.३१, जिल्हाधिकारी कार्यालय यांना दि.१८.०४.२०२२ रोजी दिलेले पत्र नि.३२, निवासी उपजिल्हाधिकारी–जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अर्जदार क्र.४ च्या नावे दिलेले पत्र दि.१५.०९.२०२२ नि.३३, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी मयत आसाराम याच्या नावे दिलेले पत्र नि.३४, मयत आसाराम याचे मृत्युप्रमाणपत्र नि.३५, मयत हौसाबाई हिचे मृत्युप्रमाणपत्र नि.३६, मयत हौसाबाई हिचे मतदान कार्ड नि.३७, मयत हौसाबाई हिचे आधार कार्ड नि.३९, मयत आसाराम याचे स्वातंत्र्य सैनिकाचे ओळखपत्र नि.४०,

अर्जदार क्र.१ ते ४ यांचे आधार कार्ड नि.४१ ते ४४ व ग्रामपंचायत कार्यालय, आंतरवाली खांडी, ता. पैठण यांनी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांची साक्षशपथपत्रे नि.२४ ते २६ दाखल करुन अर्जदार क्र.४ च्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास त्यांची हरकत नसल्याचे म्हटले आहे. साक्षपुरावा बंदची पुरसिस नि.३८ वर आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता, नि.३५ वरील मृत्यू प्रमाणपत्रामध्ये असाराम याचा मृत्यू दि.३०.०९.२०११ रोजी झाल्याचे नमुद आहे. तसेच नि.३६ वरील हौसाबाई हिचे मृत्यु प्रमाणपत्रात ती दि.३०.११.२०१५ रोजी मयत असल्याचे नमुद आहे. आजपावेतो अर्जदारांच्या अर्जास कोणाचाही आक्षेप आलेला नाही. त्यायोगे सदर अर्जदार हे मयत हौसाबाई व मयत आसाराम यांचे वारस असल्याची बाब अविवादित राहिल्याचे आढळुन येते.

७. याठिकाणी हे नमुद करणे महत्वाचे व आवश्यक आहे की, सदर प्रकरणाकामी केवळ विचारार्ह बाब अशी आहे की, मयत हौसाबाई व आसाराम यांचे अर्जदार १ ते ४ हे वारस आहेत काय?.

८. उपरोक्त सर्व बाबींचे एकत्रित अवलोकन केले असता, अर्जदार हे मयत आसाराम व हौसाबाई यांचे वारस असल्याचे दिसुन येते. अभिलेखानुसार नि.३३ वरील निवासी उपजिल्हाधिकारी– जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अर्जदार क्र.४ च्या नावे दिलेले दि.१५.०९.२०२२ रोजीचे पत्राचे अवलोकन करता त्यात हौसाबाई आसाराम घुगे, रा. आंतरवाली खांडी, ता. पैठण यांचे नावे ०१.०६.२००४

ते ३०.११.२०१५ या कालावधीतील राज्य शासन स्वातंत्र्य सैनिक निवृत्ती वेतन फरकाची रक्कम रु.७,७९,२९६/- अनुज्ञेय आहे. ती त्यांचे कायदेशिर वारसांना देय आहे, त्याकरीता न्यायालयाकडुन सक्सेशन सर्टिफिकेट कार्यालयास सादर करावे असे नमुद आहे. त्याबाबत अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांची शपथपत्रे दाखल करुन अर्जदार क्र.४ च्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यास त्यांची हरकत नसल्याचे म्हटले आहे. सबब, अर्जदार क्र.४ च्या नावे अर्जात नमुद रक्कम मिळण्याचे कार्यवाहीसाठी वारसप्रमाणपत्र (Succession Certificate) जारी करणे योग्य होईल.

९. यास्तव, मी खालील आदेश पारीत करतो :

**आदेश**

१) अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत आसाराम कारभारी घुगे व हौसाबाई आसाराम घुगे यांचे कायदेशिर वारस असल्याचे निष्कर्षीत करण्यात येते.

२) अर्जदार क्र.४ यास स्वतःसाठी तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांच्यातर्फे वरील रक्कम रु.७,७९,२९६/- बाबत अर्जदार क्र.४ च्या नावे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) अर्जदारांनी आवश्यक ते कोर्ट फी/शुल्क जमा केल्यानंतर जारी करण्यात यावे.

Digitally signed by KIRAN SAHEBRAO JADHAV
Date: 2023.05.02 17:03:47 +0530

(के. एस. जाधव)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
औरंगाबाद

दि.०२/०५/२०२३

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Santosh B. Satpute |
| Name of the Court | : | 2nd Jt. CJSD Court, Aurangabad. |
| Order date | : | 02.05.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 02.05.2023 |
| Order uploaded on | : | 02.05.2023 |